# रोजगार हमीतून ‘उपजीविकेची हमी’ कोणाला? कशी?

## कार्यकर्ते आणि अभ्यासकांच्या चर्चासत्राचा अहवाल

संसाधने व उपजीविका गट , प्रयास, पुणे
आणि
वृक्षमित्र, चंद्रपूर

१७ व १८ मार्च २००५

# पार्श्वभूमी

महाराष्ट्र राज्याची रोजगार हमी योजना हा नेहमीच कार्यकर्ते आणि अभ्यासकांच्या जिव्हाळ्याचा विषय राहिलेला आहे. 'वंचितांच्या उपजीविका शाश्वतीला विकास–कार्यक्रमांत अग्रस्थान मिळावे', या उद्दिष्टासाठी काम करताना प्रयासच्या 'संसाधने व उपजीविका' गटालाही या योजनेची काही वैशिष्ट्ये अतिशय महत्त्वाची वाटली. उदा. गरिबांना केवळ तात्पुरत्या रोजगाराची नव्हे तर चिरस्थायी उपजीविकेची हमी देण्याची ताकद योजनेत आहे; योजनेला कायद्याचा आणि निधीचा भरभक्कम आधार आहे. तरीही रोजगार हमी प्रामुख्याने 'दुष्काळी व त्यामुळे तात्पुरता रोजगार देणारी योजना' म्हणूनच राबवली जात आहे. पारदर्शकतेच्या, उत्तरदायित्वाच्या अनेक तरतुदी योजनेच्या मूळ संरचनेत असल्या तरीही प्रत्यक्षात मात्र योजनेचा कारभार भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार यांनी पोखरला आहे. रोजगार हमीच्या प्रश्नावर एकेकाळी मजबूत असणारे चळवळी व स्वयंसेवी संस्थांचे संघटनही त्यावर अंकुश ठेवण्याइतके सक्षम राहिलेले नाही. शासकीय पातळीवर मात्र वंचितांसाठी मारक असे बदल वेगाने घडवले जात आहेत. राष्ट्रीय पातळीवर देखील महाराष्ट्राच्या धर्तीवर 'रोजगार हमीसाठी' व ती मर्यादित करण्यासाठी वाद–प्रतिवाद सुरू आहेत.

या पार्श्वभूमीवर, रोजगार हमी खऱ्या अर्थाने वंचिताभिमुख व्हावी म्हणून काम व अभ्यास करणाऱ्या कार्यकर्ते–अभ्यासकांनी पुन्हा एकदा एकत्र यावे, अभ्यास व विश्लेषणाच्या आधारे गावपातळीवर काय करता येईल व संघटितपणे राज्यस्तरावर काय करता येईल याची आखणी करावी, आणि सातत्याने होणाऱ्या या विचार–विनिमयातून 'रोजगार हमीचा' डावलला जाणारा मुद्दा पुन्हा एकदा पुढे यावा, यासाठी काही प्रयत्न करायचे प्रयासने ठरवले. मोहन हिराबाई हिरालाल यांच्यासारख्या अनुभवी कार्यकर्त्यांनी देखील प्रयासने अशा प्रकारचा पुढाकार घ्यावा असे वेळोवेळी आवर्जून सुचवले होते. त्यानुसार योजनेवरील अभ्यास–साहित्य, काही जाणकार कार्यकर्ते व अभ्यासक तसेच काही संवेदनशील शासकीय अधिकाऱ्यांच्या मुलाखती आणि योजनेसंबंधीचे निवडक शासन–निर्णय, यांच्याआधारे अभ्यासाची सुरुवात केली. रोहयो निधीचा उपयोग वंचितांना केवळ तात्पुरता नव्हे तर कायमस्वरूपी उपजीविका मिळण्यासाठी होणे व योजनेच्या संपूर्ण कारभारावर (केवळ अंमलबजावणीवर नव्हे) वंचितांचे नियंत्रण येणे, त्यासाठी वंचितांची, त्यांच्यासोबत काम करणाऱ्या स्वयंसेवी गट संघटनांची ताकद वाढणे हे कळीचे मुद्दे या अभ्यासातून ठळकपणे पुढे आले. योजनेच्या अंगभूत बलस्थानांचाच उपयोग त्यासाठी करून घेता येईल, मात्र काही अनुत्तरित प्रश्नांसाठी योजनेत नव्याने देखील काही बदल सुचवावे लागतील, नव्या मागण्या व त्यासाठीचे युक्तिवाद उभे करावे लागतील हेही या अभ्यासातून समजत गेले. म्हणूनच 'वृक्षमित्र' च्या सहयोगाने आयोजित केलेल्या या दीड दिवसाच्या चर्चासत्राची आखणी तीन प्रमुख प्रश्नांभोवती केली :

**१. रोजगार हमीच्या संपूर्ण कारभारावर वंचितांचे/त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्था–संघटनांचे नियंत्रण कसे आणता येईल?**

(अ) त्यासाठी योजनेतील अंगभूत बलस्थानांचा उपयोग कसा करता येईल?

(ब) कोणत्या मुद्द्यांसाठी नवीन मागण्या/युक्तिवाद उभे करावे लागतील?

(क) वंचितांना मारक असे जे बदल योजनेत शासकीय पातळीवरून केले जातात, त्यासाठी काय प्रयत्न करता येतील?

**२. रोजगार हमीतून अल्पभूधारकांना त्याचप्रमाणे भूमिहीनांना उपजीविकेची कायमस्वरूपी हमी कशी देता येईल?**

(अ) रोजगार हमीतील कोणत्या अंगभूत बलस्थानांचा उपयोग त्यासाठी कसा करता येईल?

(ब) कोणते मुद्दे–मागण्या–युक्तिवाद नव्याने उभे करावे लागतील?

**३. वरील दोन्ही मुद्द्यांच्या अनुषंगाने, स्थानिक, जिल्हा, राज्य व राष्ट्र अशा विविध स्तरांवर स्वतंत्रपणे तसेच संघटितरीत्या काय प्रयत्न करता येतील?**

चर्चासत्राआधी हे सर्व मुद्दे व एक टिपणही सर्व सहभागींना पाठवले होते. १ व २ या मुद्द्यांसाठी 'रोहयोतील अंगभूत बलस्थानांचा उपयोग कसा करता येईल' या प्रश्नावर विचारविनिमय करताना संदर्भ म्हणून उपयोगी पडतील असे

शासन निर्णय व त्यांचे प्राथमिक विश्लेषण या टिपणात समाविष्ट केले होते. चर्चासत्रातील अनुभवी कार्यकर्ते व अभ्यासक त्याचप्रमाणे नवीन कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमुळे या प्रश्नांवर विविधांगी चर्चा झाली व 'काय करता येऊ शकेल', याच्या विविध शक्यता पुढे आल्या. या सर्व चर्चेचा आढावा खाली दिलेला आहे.

## चर्चासत्राचा आढावा

दीड दिवसांतील चर्चा एकूण पाच सत्रांमध्ये विभागली होती. प्रत्येक सत्राच्या सुरुवातीला एक किंवा दोन कार्यकर्ते/अभ्यासकांनी त्यांच्या अनुभव–अभ्यासाची मांडणी केली. प्रत्येक मांडणीनंतर उपस्थित गटाच्या प्रतिक्रिया व प्रश्न यातून त्या–त्या विषयावरील चर्चा आकाराला येत गेली. सर्व सत्रांतील मांडणी व त्यावरील चर्चा प्रामुख्याने दोन मुद्द्यांच्या अनुषंगाने झाली : १) योजनेचा कारभार २) योजनेचा आशय. त्यामुळे चर्चासत्रातील प्रत्यक्ष वेळापत्रकानुसार आढावा घेण्याऐवजी प्रामुख्याने 'कारभार' विषयक मांडणी – त्यावरील चर्चा आणि आशयविषयक मांडणी व त्यावरील चर्चा अशा स्वरूपात हा आढावा मांडलेला आहे :

## कार्यकर्ते–अभ्यासकांनी केलेली मांडणी :

### (अ) अश्विनी कुलकर्णी (वचन, नाशिक)

रोजगाराअभावी जिथे खाण्या–पिण्याची भ्रांत होती आणि जिथे रस्ते–पाणी अशा मूलभूत सुविधादेखील पोचल्या नव्हत्या, अशा आदिवासी भागात श्रमजीवी संघटनेच्या सहभागाने नाशिकमधील तीन तालुक्यांत रोजगार हमीची कामे सुरू करण्याचा गेल्या चार वर्षांचा अनुभव अश्विनी कुलकर्णी यांनी मांडला. त्यांच्या मांडणीतील ठळक मुद्दे याप्रमाणे होते :

- **<u>काम मिळण्याला प्राधान्य :</u>** वेळेवर काम मिळणे हेच आदिवासींसाठी अतिशय गरजेचे असल्याने रोहयोच्या कायदेशीर चौकटीप्रमाणे १–४ नमुन्यांचा आग्रह न धरता केवळ साध्या कागदावर निवेदन देऊन सामूहिकरीत्या मागणी केली. कायदेशीर चौकटीतील बारीक–सारीक तरतुदींचा आग्रह धरताना संघर्षाच्या भूमिकेऐवजी 'वेळेवर काम मिळावे' ही भूमिका घेतली. या भूमिकेतून मागणी केल्यावर कामे मिळाली नाहीत असा अनुभव कधीच आला नाही. तालुका स्तरावरील रोजगार हमी समितीतील एक (आदिवासी) सदस्य श्रमजीवी संघटनेचे सक्रिय कार्यकर्ते असल्याचा देखील यासाठी वेळोवेळी उपयोग झाला. 'अमुक एकच काम हवे' असा आग्रह धरला नाही. शेल्फवर तयार असलेली कामे स्वीकारली. त्यातून रस्ते, गावतळे, चेकडॅम अशा प्रकारची कामे आत्तापर्यंत झाली. आत्तापर्यंत विकासाचे कोणतेच काम या भागात झाले नसल्यामुळे निवड केलेली नसूनही ही कामे आदिवासींना उपयुक्त वाटली.
- **<u>अंमलबजावणीवर लोकसहभागातून नियंत्रण :</u>** अंमलबजावणीबाबतही पाळणाघर, फर्स्ट एड अशा सुविधा इत्यादी अपेक्षित तरतुदी पूर्ण झाल्या नाहीत, तरी त्यासाठी आग्रह न धरता मोजमापानुसारच व वेळेवर मजुरी मिळावी यासाठीच प्रयत्न करण्याचे धोरण ठेवले. त्यानुसार रोहयो काम करणाऱ्या स्थानिक आदिवासी तरुणांनाच झालेल्या कामाचे मोजमाप करण्याचे प्रशिक्षण दिले. काम करताना यंत्रांचा अनावश्यक वापर होणार नाही, त्याचप्रमाणे मोजमापानुसारच व वेळेवर मजुरी मिळावी यासाठी स्थानिक लोकांमध्ये जागृती निर्माण केली. संस्थेनेही कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहून गैरव्यवहार होऊ नयेत याची दक्षता घेतली.
- **<u>स्थानिक पातळीवर रोहयोबाबत जागृती :</u>** या सर्व कामातून स्थानिक पातळीवर रोजगार हमीची पुरेशी माहितीच नसते, हा मुद्दा ठळकपणे पुढे आला. त्यामुळे संस्थेने रोहयोची माहिती ग्रामीण भागात पोचवण्यासाठी, स्थानिक वृत्तपत्रात रोहयोवर वर्षभर सदर चालवणे, रेडिओवर १२ भागांत एक श्रुतिका प्रक्षेपित करणे अशा प्रकारचे उपक्रम राबवले. गावपातळीवरील कार्यकर्त्यांसाठी साध्या–सोप्या भाषेत रोहयोची माहिती देणारी पुस्तिकादेखील (लेखन– प्रा.संजय सावळे) संस्थेने त्यांना आलेल्या अनुभवाच्या आधारे तयार केली. त्याचा परिणाम म्हणून या वर्षी रोहयोची ८०% कामे सुरू झालेली दिसली. गेल्या ७ वर्षांतील सरकारी रेकॉर्डनुसार हे प्रमाण सर्वाधिक आहे.

- **<u>काय करायला हवे?</u>** या सर्व अनुभवातून काय करायला हवे होते, तसेच यापुढे काय करता येईल याचेही काही मुद्दे अश्विनी कुलकर्णी यांनी मांडले, ते याप्रमाणे :
  - तालुकास्तरावरील रोहयो कामांची नीलप्रत पहता येऊ शकते आणि त्याचा उपयोग स्थानिक लोकांसाठी उपयुक्त कामांची निवड करण्यासाठी करता येऊ शकतो.
  - विविध स्तरांवरील समित्यांच्या व दक्षता पथकांच्या माध्यमातून रोहयोच्या कारभारावर नियंत्रण आणण्याचे प्रयत्न होणे गरजेचे आहे.
  - रोहयोची कामे पूर्ण झाल्यावर त्याचा दीर्घकालीन फायदाही स्थानिकांनाच व्हावा यासाठी ही कामे देखभालीसाठी ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करण्याचा आग्रह धरणे गरजेचे आहे.
  - विविध जिल्हापातळीपर्यंतची सरकारी कागदपत्रे पहाताना त्यातील नोंदी कोणतेही विश्लेषण करण्यासाठी अपुऱ्या आहेत हे जाणवते. त्यामुळे स्वयंसेवी संस्थांनी आपापल्या क्षेत्रातील रोहयो कामांची पद्धतशीर नोंद करणे व शासकीय पातळीवरही ती व्हावी असा आग्रह धरणे अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असेल.

रोहयोचा फायदा वंचितांना थेटपणे होण्यासाठी गावपातळीवर काम करणाऱ्या संस्थांना योजनेतील अंगभूत बलस्थानांचाच उपयोग कसा करता येतो याची मांडणी अश्विनी कुलकर्णी यांच्या अनुभवातून पुढे आली. रोहयोतील अंगभूत बलस्थाने व त्यांचे वास्तव याच विषयावर नागेश हटकर यांचे विवेचन आधारित असल्याने त्याचा सारांश यानंतर मांडलेला आहे.

## (ब) नागेश हटकर (जनसहयोग ट्रस्ट, मुंबई)

'रोहयोच्या संरचनेत वंचितांसाठी मारक ठरतील असे बदल शासकीय यंत्रणा वेळोवेळी करत आलेली आहे; योजनेच्या कारभारात देखील म्हणजेच नोंदणी, कामांची आखणी, अंमलबजावणी व नियमन या प्रत्येक टप्प्यावर निरनिराळे अडथळे शासन–यंत्रणा सातत्याने आणत आलेली आहे. रोहयोचा फायदा वंचिताऐवजी प्रस्थापितांनाच व्हावा यासाठीची ही पद्धतशीर कारवाई आहे, म्हणूनच या बदलांचा–अडथळ्यांचा सामना केल्याखेरीज, त्यांना पर्याय उभे केल्याखेरीज, वंचितांसाठी रोहयो हितकर होऊ शकणार नाही.' या भूमिकेतून नागेश हटकर यांनी आपल्या प्रदीर्घ अनुभवाच्या आधारे मांडणी केली. त्यांच्या मांडणीतील ठळक मुद्दे याप्रमाणे होते :

**<u>१) योजनेच्या कारभारात आणले जाणारे अडथळे</u>**

**अ) नोंदणी :** 'मागेल त्याला काम' मिळण्याची तरतूद असूनही काम मिळू नये असे प्रयत्न सरकारी कर्मचाऱ्यांकडून केले जातात. 'रोहयो कामांना मागणीच नाही' असा अपप्रचार करता यावा म्हणून, मजुरांची नावे नोंदवून घ्यायला टाळाटाळ करतात.

**ब) अंमलबजावणी :** नावे नोंदवलीच तर कामे वेळेवर सुरू करत नाहीत, उशिराने सुरू केलेल्या कामात देखील सातत्य नसते. अशा अपुऱ्या कामाची मजुरीही अपुरी व ती देखील उशिरा दिली जाते. हातावर पोट असणाऱ्या मजुराला दिवाळी अथवा होळीनंतरचे सहा महिने सलग काम मिळण्याची, शिवाय केलेल्या कामाची मजुरी रोज, निदान दर आठवड्याला मिळण्याची गरज असते. त्यामुळे उशिराने तेही जेमतेम ३–४ दिवस मिळणाऱ्या कामाचा, त्यापासून मिळणाऱ्या उशिराच्या व तुटपुंज्या मजुरीचा भरवसा मजुरांना वाटत नाही, जगण्यासाठी रोहयोवर विसंबण्याऐवजी स्थलांतर करणे ते पत्करतात. याचाच फायदा घेऊन बंद पडलेली कामे पुन्हा सुरू करण्यासाठी 'मजूरच उपलब्ध नाहीत' असा प्रचार शासकीय यंत्रणेकडून केला जातो आणि मजुरांअभावी यंत्र वापराला परवाना दिला जातो.

रोहयोचा निधी वापरला जाऊ नये, तसेच कंत्राटदार व सरकारी कर्मचारी या दोन्ही गटांचे परस्पर हितसंबंध अबाधित रहावेत अशा दुहेरी हेतूने 'मजुरांनी कंटाळून स्थलांतरच करावे' अशी परिस्थिती निर्माण केली जाते.

**क) नियमन :** रोजगार हमी ही मुळातच पारदर्शी योजना आहे; उत्तरदायित्वाच्या अनेक तरतुदी त्यात आहेत. म्हणूनच सरकारी यंत्रणेला त्या जाचक होतात. किंबहुना संघटना व संस्था जाब मागतात म्हणून त्यांच्या कार्यक्षेत्रात कामे काढण्याची टाळाटाळ केली जाते.

प्रत्येक पातळीवरील नियमनासाठी दक्षता–समित्यांच्या नेमणुका व्हाव्यात, एवढेच नव्हे तर कामाच्या ठिकाणी १०० पेक्षा जास्त मजूर संख्या असल्यास तेथेही दक्षता समिती नेमली जावी, या तरतुदी प्रत्यक्षात येत नाहीत. दक्षता समित्या नेमल्या गेल्या तरीही त्यात मजूर प्रतिनिधी व अशासकीय सदस्यांना नेमण्याऐवजी आपापल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनाच पदे देऊन खूष करण्याचे धोरण राबवले जाते. वंचितांना या समित्यांमध्ये प्रतिनिधित्व मिळालेच पाहिजे असा आग्रह धरण्यात स्वयंसेवी संस्था–संघटनाही कमी पडलेल्या आहेत.परिणामी योजनेच्या कारभारावर वंचितांचा अंकुश राहत नाही,

**ड) कामांची आखणी :** कामांची आखणी करतानाही मोठ्या श्रीमंत शेतकऱ्यांकडेच योजनेचा निधी वळवण्याचे प्रयत्न यापूर्वी देखील झालेले आहेत. फळबाग योजना हे त्याचेच उदाहरण. श्रीमंत शेतकऱ्यांचा *जोजोबा* लागवडीचा प्रस्तावही सध्या शासनाच्या विचाराधीन आहे. शेतमजूर कामगार रोजगार हमी समन्वय समितीच्या कार्यकर्त्यांपासून हे लपवण्याचा प्रयत्नही शासकीय यंत्रणेने केला. अशा प्रकारचे प्रयत्न यापुढेही मोठ्या प्रमाणावर व वेगाने होतील अशीच शक्यता शासकीय पातळीवरून केल्या जाणाऱ्या बदलांमधून दिसून येते.

**<u>२) शासकीय पातळीवरील बदल</u>**

**अ) किमान वेतन :** रोजगार हमीमध्ये विविध खात्यांची कामे केली जात असली तरी रोहयो मजुराचे किमान वेतन मात्र शेतमजुरांइतकेच ठेवण्यात आले आहे. त्यामुळे विविध खात्यांची मजुरी व रोहयोचे किमान वेतन यात मोठीच तफावत राहते. उदा. सार्वजनिक बांधकाम खात्याची मजुरी १४० रु. पाटबंधारे खाते व फॉरेस्ट वर्करची मजुरी ७१ रु. असूनही रोहयो मजुराचे किमान वेतन मात्र ४५, ४७, ४९, ५१ रु. एवढेच आहे. रोहयो किमान वेतन इतके कमी असल्याची दोन कारणे आहेतः १) 'महागाईच्या प्रमाणात किमान वेतनात वाढ करावी' असा कायदा असतानाही तशी वाढ केली गेलेली नाही. २) विखे–पाटील समिती, नॅशनल कमिशन फॉर रूरल लेबर यासारख्या आयोगांनी केलेली 'दर दोन वर्षांनी किमान वेतनाची पुनर्रचना करण्याची' शिफारसही शासनाने धुडकावलेली आहे, हे आतापर्यंतच्या पुनर्रचनेचा आलेख बघितल्यास कळते :

| वर्ष | किमान वेतन (रु.) | पुनर्रचना कालावधी (अंदाजे) |
|---|---|---|
| १९७४ | २.० | ---- |
| १९७८ (ऑक्टो) | ४.० | ४ वर्षे |
| १९८४ (मे) | १२. | ६ वर्षे |
| १९९० (जून) | २०. | ६ वर्षे |
| १९९४ (मे) | ३५ | ४ वर्षे |
| २००१ (मार्च) | ४५ | ७ वर्षे |

**ब) दरपत्रकातील बदल :** २००१ (मार्च) मध्ये झालेल्या दरपत्रकाच्या पुनर्रचनेनंतर अचानकच १६ ऑगस्ट २००४ला नवीन दरपत्रक काढले गेले. 'सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे खात्यांच्या दरापेक्षा रोहयोची मजुरी काही वेळा जास्त तर काही वेळा कमी पडते' असे कारण देऊन अमरावतीच्या कार्यकारी अभियंत्यांच्या अध्यक्षतेखाली 'डी.के.तायवाडे' समिती नेमण्यात आली. या समितीमध्ये विधानसभा सदस्य, रोजगार हमी सदस्य, मजूर व संघटना प्रतिनिधी यांपैकी कोणाचाही समावेश नव्हता. या समितीच्या अहवालानुसार दरपत्रकात बदल करण्यात आले.

हे बदल वंचितांसाठी उघडपणे मारक ठरणारे आहेत. उदा. रोजगाराच्या संधी कमी व्हाव्यात यासाठी केलेले बदल :

- रोहयो कामांची संख्या ६९वरून ३९ आणण्यात आली आहे व दगडफोडींची सर्व कामे त्यातून वगळली गेली आहेत.
- अकुशल व कुशल कामांचे ६०:४० हे प्रमाण ५१:४९ वर आणण्यात आले आहे.
- मजुरांकरवी होणाऱ्या दगड व माती वाहतुकीसाठी १५० मीटर लीडपर्यंतचे पैसे १०० मीटरवर आणले, १५ मीटरपर्यंत असणारी लिफ्ट उचल १० मीटरपर्यंत आणली.
- सदोष तुलना व विसंगतीपूर्ण विश्लेषण– हे बदल करताना अत्यंत चुकीचे निकष लावले गेले. कंत्राटदारांमधील स्पर्धेमुळे शासनाची अवजड यंत्रसामग्री पडून राहू नये म्हणून कंत्राटदारांनी बांधकाम व पाटबंधारे खात्याला सादर केलेल्या निविदांच्या दराशी तुलना करून रोहयो किमान वेतनाची पुनर्रचना केली गेली. खरे पाहता रोहयो मजुरांच्या किमान वेतनाची तुलना बांधकाम वा पाटबंधारे खात्याच्या कामगाराला मिळणाऱ्या *मजुरीशी* करायला हवी. तसे केल्यास कोणतेही मोजमाप वापरले तरीही रोहयो कामगारांची मजुरी इतर कोणत्याही खात्याच्या मजुरीपेक्षा कमी आहे हेच निर्विवादपणे सिद्ध होते. प्रत्यक्षात मात्र १९९८–९९ साली खात्याने केलेल्या विश्लेषणानुसार १० घनमीटरचा हिशोब ठरवला गेला. त्यातही मजुराची १५% क्रयशक्ती कमी धरली गेली, म्हणजे केलेल्या कामाच्या किंमतीपेक्षा १५% कमी मजुरी ठरवली गेली. 'कंत्राटदारांनी स्पर्धेपोटी सादर केलेल्या निविदा कमी किंमतीच्या असतात व त्यामुळे त्याआधारे ठरवलेले दर कमी होत जातात. त्यामुळे मजुरांच्या श्रमाची तुलना कंत्राटदारांच्या निविदांशी करणे संयुक्तिक नाही' असे विश्लेषण शासकीय यंत्रणेनेच याच अहवालात एके ठिकाणी केलेले आहे, ही मोठीच विसंगती म्हणावी लागेल.

**क) शेतमजूर कामगार रोजगार हमी समन्वय समितीचा हस्तक्षेप:**

- समितीच्या काही कार्यकर्त्यांनी या सर्व गोष्टी शासनाच्या निदर्शनास आणून त्याचा सातत्याने पाठपुरावा केला. शासनाने शक्य तितकी टाळाटाळ–टोलवाटोलवी केली. तायवाडे समितीचा अहवालही मंत्र्यांना घेराव माहितीच्या अधिकाराचे शस्त्र वापरल्यावरच मिळाला. सातत्याच्या पाठपुराव्यानंतर शासनाने एक पुनर्विलोकन समिती नेमली पण या समितीने ठरवलेले मजुरीचे दरही खूपच कमी होते. रोजगार हमी समन्वय समितीने याचाही पाठपुरावा केला. त्यानंतर समितीने केलेल्या काही सुधारणा स्वीकारून शासनाने दगडफोडीची बंद केलेली कामे पुन्हा सुरू केली आणि लीड व लिफ्टच्या दरातील बदल रद्द केले.
- किमान वेतन कायद्यानुसार किमान वेतनात कोणताही बदल करताना सर्व संबंधित पक्षांची समिती नेमणे अपेक्षित असते. त्याचप्रमाणे शासनाने एखादा आदेश काढल्यास दोन महिने तो सर्वांच्या मतांसाठी प्रस्तावित करून, मते आल्यानंतरच किमान वेतनाची मांडणी करायची असते. या कायदेशीर तरतुदींनुसार समन्वय समितीने शासनाकडे खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे : यापुढील कोणतेही बदल करताना शासकीय अधिकारी, मजूर–प्रतिनिधी आणि महाराष्ट्र विधानसभेच्या रोजगार हमी समिती सदस्यांची संयुक्त बैठक व्हावी आणि त्यातच हे बदल ठरावेत. समितीची ही मागणी शासनाने तोंडी मान्य केलेली आहे.

**ड) रोहयोचा कारभार पारदर्शक व जाबदायी करण्याची गरज :** वरील सर्व बदलांच्या संदर्भात नागेश हटकर यांनी रोहयोचा एकूण कारभारच पारदर्शक व उत्तरदायी करण्याची गरज मांडली. ती याप्रमाणे :

- रोहयोचा मूळ कायदाच वारंवार होणाऱ्या या बदलांनी पालटवून टाकला आहे. एखाद्या कायद्यात किती बदल करता येतील यावर मर्यादा घालण्याची गरज आहे.

- रोहयोत केल्या जाणाऱ्या बदलांसंबंधी काढल्या गेलेल्या शासन निर्णयांची संख्या हजारांच्या घरात आहे. हे शासन–निर्णय मजुरांपर्यंत तसेच जनसंघटनांपर्यंत वेळच्या वेळी पोचावेत यासाठी कोणतीही दक्षता घेतली जात नाही. ज्या योजनेत लाखोंच्या संख्येने मजूर काम करतात, त्या योजनेतील कोणत्याही बदलाची प्रसिद्धी रेडिओ व टीव्हीवरुन झाली पाहिजे.
- विविध स्तरावरील रोजगार हमी समित्यांमधील मजूर प्रतिनिधी व अशासकीय सदस्यांची संख्या वाढायला हवी.
- रोहयोचा कारभार वंचितांच्या हिताचा न होण्यामागे राजकीय इच्छाशक्तीचा अभाव हे महत्त्वाचे कारण आहे. म्हणूनच शेतमजूर व छोट्या शेतकऱ्यांची संघटना व्यापक व बळकट करण्यासाठी, त्याद्वारे राजकारणाला वंचितांचा अंकुश लावण्यासाठी प्रयत्न करणे अतिशय गरजेचे आहे.

रोजगार हमीचा कारभार वंचितांसाठी हितकारक होण्यासाठी योजनेतील अंगभूत बलस्थानांचा उपयोग कसा करता येईल व नव्याने कोणत्या मागण्या – पर्याय उभे करावे लागतील अशा दोन्ही मुद्द्यांचे विवेचन नागेश हटकर यांच्या मांडणीतून झाले.

**मोहन हिराबाई हिरालाल** यांनीही कारभारविषयक काही मुद्द्यांची मांडणी केली. ती खालीलप्रमाणे :

- **<u>रोहयोतून निव्वळ रोजगार नव्हे 'कामाचा हक्क' :</u>** केवळ सरकारच्या सोयीने काम मागणे, हक्काचा आग्रह न धरणे यामुळे संघटन बळकट होत नाही. कामाचा हक्क हाच रोहयोचा गाभा आहे, म्हणून हक्क म्हणूनच काम मागितले गेले पाहिजे. त्यातूनच खरी लोकशक्ती संघटित होऊ शकते. रोहयोतून मिळणाऱ्या कामावर लोकांना 'हक्क' सांगता यावा यासाठी बारकाव्यांचा विचार करून योजनेत विविध तरतुदी केलेल्या आहेत. केवळ एका व्यक्तीने मागणी केली तरीदेखील त्याला काम मिळण्याचा हक्क आहे. एक ते अकरा नंबरच्या नमुन्यामधूनही या तरतुदी दिसून येतात. नोंदणी झाल्याचा, काम मागितल्याचा, ते न मिळाल्याचा, त्यासाठी बेकारभत्ता मागितल्याचा असे अनेक पुरावे या अर्जांमधून काम मागणाऱ्या व्यक्तीला मिळतात परंतु या तरतुदींचा वापर न करताच सरकारी यंत्रणेच्या सोयीने/मर्जीने काम मागितले जाते, त्यामुळे योजनेला 'कामाचा हक्क देणारी योजना' असे स्वरूप येण्याऐवजी 'दुष्काळी योजनेचे' स्वरूप आले आहे. 'दुष्काळी योजना' हे रोहयोचे सध्याचे स्वरूप बदलण्यासाठी रोहयोतील सर्व कायदेशीर तरतुदींचा अभ्यासपूर्वक उपयोग होणे महत्त्वाचे आहे. मात्र रोजगार हमीच्या कायदेशीर चौकटीचा (म्हणजेच १ ते ११ नमुन्यांचा) आग्रह धरण्याची रणनीतीही एका मर्यादेपर्यंतच यशस्वी होते, असा अनुभव आहे. 'या गावात, परिसरात, जिल्ह्यात काढण्याजोगे काम शिल्लक नाही, त्यामुळे काम हवे तर दुसऱ्या गावी, दुसऱ्या जिल्ह्यात जाण्याची तयारी ठेवा' असे उत्तर प्रशासकीय यंत्रणेकडून हमखास मिळते. संस्था–संघटनांकडेही यावर कोणतेच प्रत्युत्तर नसते, परिणामी चळवळही थंडावते आणि प्रशासकीय यंत्रणा व हितसंबंधियांची खेळी यशस्वी होते.
- **<u>लोकशक्तीचे संघटन :</u>** रोहयोतून कामाचा हक्क मिळवण्यासाठी स्वयंसेवी संस्था/एनजीओनीच पुढाकार घेणे व स्थानिक लोकांच्या वतीने सर्व तरतुदी पूर्ण करणे यातून 'हक्क' शाबीत होणार नाही. मुख्य पुढाकार ज्यांना काम मागायचे आहे त्यांचा हवा. स्वयंसेवी–संस्था/संघटना यांची भूमिका ही दुय्यम–लोकांना साह्य करण्याची आहे, ही दृष्टी रोहयोसाठी वंचितांना संघटित करण्यामागे असायला हवी. जिथे संस्था/संघटनेकडे प्रमुख व लोकांकडे दुय्यम भूमिका असते (उदा. शिबिर घ्यायचे का? कधी, कसे, त्यासाठी पैसे, सामान इ. ची जुळवाजुळव कशी करायची? इतर व्यवस्था कशा लावायच्या हे सर्व ठरवण्याची जबाबदारी संस्था–संघटनेकडे व सहभागी होऊन ठरल्यानुसार कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याची भूमिका लोकांकडे), तिथे लोकशक्ती जागृत होऊ शकत नाही. हा मुद्दा स्पष्ट करताना मोहनभाऊंनी लाकूड व बांधकाम कामगारांच्या संघटनेच्या वडसादेसाई येथील अनुभवाचे उदाहरण दिले. सर्व सूत्रे लोकांच्या हाती सोपवल्यावर लोकांनी पुढाकार घेऊन मजुरी व अन्नधान्याची वाण असते अशा हडूक महिन्यांमधे देखील मोठ्या प्रमाणावर रोहयो – प्रशिक्षणाची शिबिरे स्वयंस्फूर्तपणे आयोजित केली.
- **<u>वंचितांना कायदे मोडण्याचे शिक्षण :</u>** या भूमिकेतून रोहयोद्वारे कामाचा हक्क मिळवण्यासाठी लोकांना 'कायदे मोडण्याचे शिक्षण' द्यावे लागते. अगदी अशिक्षित मजुराला देखील कायदा काय सांगतो हे संबंधित कागदपत्रे दाखवून सांगता आले पाहिजे, त्याचा आग्रह धरता आला पाहिजे. आपल्या मागण्यांसाठी कायदा कसा मोडायचा व त्याचे परिणाम काय असू

शकतील, याची संपूर्ण माहिती करून घेऊनच कायदा मोडण्यासाठी लोकांनी रस्त्यावर उतरावे. वडसादेसाई येथील लाकूड व बांधकाम कामगार संघटनेचा याबाबतचा अनुभव मोठा बोलका आहे. संपूर्ण अभ्यास व तयारीनिशी लोकांनी धरणे धरले–मोर्चा काढला, सरकारी अधिकाऱ्यांना घेराव घातला आणि कायद्यानुसार 'अटक व्हावी' असा आग्रहही धरला. हजारोंच्या जमावाला अटक करणे तसेच कायद्याच्या आधारे संघटनेने आग्रह धरल्याप्रमाणे प्रत्येकाच्या नावे अटक करून सोडून दिल्याच्या पावत्या फाडणे ही शासकीय यंत्रणेच्या आवाक्यापलिकडचे होते. परिणामी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी पावत्या करण्याचे काम हाती घेतले, तर शासकीय कर्मचाऱ्यांना जमावाला पाणी पाजण्याचे काम करावे लागले आणि शासकीय वाहनाने मोर्च्यासाठी जमलेल्या लोकांची घरी परतायची सोयही करावी लागली! अभ्यास व ज्ञानाच्या आधारे संघटित झालेल्या लोकशक्तीला प्रस्थापित व्यवस्था कशी उलथता येते हे या अनुभवांतून अधोरेखित झाले.

या सर्व मांडण्यांवरील चर्चेतूनही रोहयोचा कारभार आणि आशय या विषयीच्या अडचणी तसेच, त्यावरील उपाय–पर्यायांचे काही मुद्दे पुढे आले, ते खाली दिलेले आहेत :

## अ) नोंदणी/कामे सुरू करणे

- **अडचणी –**
  - नोंदणी करूनही मजुरांना अर्ज क्र. ३ नुसार नोंदणी क्रमांक देण्यात टाळाटाळ केली जाते. नोंदणी क्रमांकाअभावी सरकारी यंत्रणेचा काम देण्यासाठी पाठपुरावा करणे कठीण जाते.
  - काम मिळण्यासाठी विहित नमुन्यानुसार अर्ज करूनही त्याची पावती (अर्ज क्र. ५नुसार) दिली जात नाही. ही पावती हा काम मागितल्याचा पुरावा असल्याने मजुरांना त्याआधारे 'कामाचा हक्क' मागता येतो.
  - संघटना–संस्थांच्या दबावामुळे नोंदणी व कामाची मागणी मान्य झालीच तरीही 'कामेच शिल्लक नाहीत' अशा सबबीखाली कामे सुरू करण्यास टाळाटाळ केली जाते.
- **उपाय–पर्याय–**

रोहयोचे काम सरकारच्या मर्जीने नव्हे तर 'हक्क' म्हणून मिळावे यासाठी नमुना क्र. ५ प्रमाणे पावतीचा आग्रह धरणे, त्यासाठी लोकसंघटन बांधणे.

  - 'कामे संपली' या सबबीला चोख उत्तर देण्यासाठी 'कोणती कामे करावीत' याचे नियोजन स्थानिक समूहांच्या हाती सोपवणे: 'पंचायत राजमध्ये महिलांनीच नियोजन करावे लागते' या शासकीय अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' या संस्थेच्या कार्यक्षेत्रातील बचतगटाच्या महिलांनी गावपातळीवर कोणती कामे करता येतील याचे नियोजन केले. शासकीय अधिकाऱ्यांना ते सादर केल्यावर 'तीन वर्षे पुरेल' इतके काम असल्याचे त्यांनी सांगितले.

## ब) अंमलबजावणी

- **अडचणी –**
  - मजुरी– उशीरा व अपुरी मिळणे, विहित दरांनुसार न मिळणे
  - कंत्राटदारी – मजुरांनी करण्याजोगी कामे यंत्रसामग्री वापरून केली जाणे/कंत्राटदारांकडे सोपवली जाणे
  - यंत्रसामग्रीचा वापर – यंत्रसामग्रीचा वापर हितसंबंधांसाठी जसा होतो, तसाच काही वेळा तो अपरिहार्य असतो असा अनुभव आनंद कपूर यांनी मांडला. पावसाळ्यात पाणी साठावे म्हणून बांधले जाणारे मातीचे बंधारे उन्हाळ्यात बांधले जातात. बंधारे पक्के होऊन पाणी साठण्यासाठी माती नीट दाबली जाणे आवश्यक असते. मानवी श्रम वापरून हे करायचे तर पाणी लागते. उन्हाळ्यात पाणी नसल्याने यंत्रांशिवाय ते होऊ शकत नाही. निधी वाया जाऊ नये व दिलेल्या मुदतीत टार्गेट पूर्ण व्हावे म्हणून शासकीय अधिकाऱ्यांना यंत्रसामग्री वापरून कामे पूर्ण करावी लागतात. यंत्रसामुग्री न वापरताही कामांचा दर्जा कसा टिकवायचा हा रोहयोतील अनुत्तरित प्रश्न आहे.
  - दुर्बल घटकांचे शोषण – 'उक्ते' घेण्यासारख्या पद्धतीमधून स्त्रिया व वृद्ध असे कामाची खरी गरज असलेले घटक वगळले जातात. तरुण–ताकदवान लोकांनीच (गावातीलच) कामे मिळवण्यासाठी 'गँग' तयार करण्याचे प्रकार सर्रास घडतात.
  - महिलांचे शोषण– कामावरील मुकादमाकडून महिलांशी गैरवर्तन करणे, अडवणूक करणे असे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडतात.
  - भ्रष्टाचार – मोजमाप व मजुरीतील घोटाळ्याखेरीज धान्याच्या स्वरूपात मिळण्याच्या मजुरीबाबतही धान्य न मिळणे/कमी–खराब प्रतीचे उशिरा मिळणे/रेशन दुकानदारांकडे उपलब्ध नसणे अशा अनुभवांना मजुरांना तोंड द्यावे लागते.
- **उपाय–पर्याय–**
  - रोहयोकडे केवळ आर्थिक प्रगतीचे साधन म्हणून न बघता 'सामाजिक न्यायाचे' माध्यम म्हणून बघणे, रोहयोतून सामाजिक न्यायाचा आग्रह धरणे.
  - भ्रष्टाचार नियंत्रणासाठी ग्रामसभा सक्षम करणे : या संदर्भात मेंढालेखा, गडचिरोली येथील अनुभव लक्षात घेण्याजोगा आहेः कोणतेही काम करण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांनी 'पैसे मागितले तर ते द्यायचे, पण पावतीही घ्यायची', असा नियम ग्रामसभेने केला. एका गावकऱ्याला अशी पावती न मिळाल्यास ज्यांचे काम नाही अशा इतर सर्व गावकऱ्यांनीही सरकारी कार्यालयात जाऊन 'त्याला पावती द्या' असा आग्रह अहिंसक पद्धतीने धरला, अशा प्रकारचा शांततापूर्ण दबाव आणल्याने स्थानिक पातळीवर सरकारी यंत्रणेकडून होणाऱ्या भ्रष्टाचारावर अडाणी–अशिक्षित समजल्या जाणाऱ्या आदिवासी समाजाचे प्रभावी नियंत्रण आले. ग्रामसभेच्या माध्यमातून आलेले गावसमाजाचे सशक्त असे संघटन 'रोहयो' अंमलबजावणीत होणाऱ्या भ्रष्टाचारालाही अंकुश लावू शकते, ही शक्यता या अनुभवातून अधोरेखित होते.
  - महिलांसंदर्भात होणारे शोषण : ज्या कामांवर मुकादम असणे खरोखर गरजेचे आहे अशाच कामांवर मुकादम नेमले जावेत व स्थानिक महिलांची मुकादम म्हणून नेमणूक व्हावी.
  - मजुरीबाबत होणाऱ्या भ्रष्टाचारालाही याच पद्धतीने आळा घालता यावा. लोकसमन्वय (नंदुरबार) या संघटनेचा अनुभव या संदर्भात महत्त्वाचा आहे. 'कामाबरोबर अन्न' या तरतुदीअंतर्गत प्रदेश व स्थानिक लोकांच्या गरजेनुसार धान्य मिळण्याऐवजी सरसकटपणे गहू दिला जातो. आदिवासी समाजाचे पारंपरिक धान्य तांदूळ असल्याने, त्यांना या गव्हाचा उपयोग होत नाही. नंदूरबारच्या या आदिवासींनी लोकसमन्वयाच्या मदतीने ५कि. गव्हाऐवजी ५ कि. तांदूळ मिळावेत' ही मागणी लावून धरली व संघटनाच्या बळावर कामाच्या मोबदल्यात तांदूळ व मजुरी असा बदल यशस्वीपणे घडवून आणला.

- पुरेशी व न्याय्य मजुरी मिळणे महत्त्वाचे आहेच, त्याचबरोबर मजुरी किती असावी, ती कोणत्या स्वरूपात व केव्हा मिळावी, हे ठरवण्याचा अधिकार रोहयोवर काम करणाऱ्या मजुरांच्या हाती असणे, हा मजुरीबाबतच्या गैरव्यवहारावर शाश्वत असा तोडगा असू शकतो, लोकसमन्वयच्या अनुभवातून हाच व्यापक मुद्दा सूचित होतो.
- रोहयो कारभारावर नियंत्रण आणण्यासाठी स्थानिक पातळीवर वंचितांचे संघटन बांधणे तर महत्त्वाचे आहेच, त्याचबरोबर 'रोहयो'साठी कर भरणाऱ्या नागरिकांचा 'करदात्यांचा दबाव गट' बांधणेही गरजेचे आहे. रोहयो कारभारात जाबदायित्व आणण्यासाठी असे दबावगट महत्त्वाची भूमिका बजावू शकतील.

## क) रोहयोचा आशय

♦ <u>अडचणी–</u>

- रोहयोच्या माध्यमातून लाखो गरिबांची उपासमार वाचली तरी कायमस्वरूपी दुष्काळ–निर्मूलन मात्र झाले नाही.
- उत्पादक साधनांचा फायदा प्रस्थापितांना झाला व गरिबांना केवळ तात्पुरता रोजगार व मजुरी मिळत राहिली.
- 'जमीन व पाणी' या नैसर्गिक संसाधनांपुरताच रोहयोचा आवाका प्रामुख्याने मर्यादित राहिला. ज्यांच्याकडे जमिनीच नाहीत किंवा निष्कृष्ट जमिनी आहेत. (उदा. आदिवासी, मराठवाड्यातील गायरानाच्या लढ्यात यशस्वी होऊनही निष्कृष्ट जमिनीच मिळवलेले दलित) अशा गटांपर्यंत रोहयो कामांचा फायदा पोचत नाही.
- रस्ते, फळबागा यांसारख्या कामांना रोहयोत मिळालेल्या प्राधान्यामुळे नैसर्गिक संसाधनांच्या विकासाचे उद्दिष्ट डावलले जाते.

♦ <u>उपाय–पर्याय–</u>

- रोहयो अंतर्गत केवळ रस्ते/विहिरी अशी दुष्काळी कामे न घेता, वंचितांच्या उपजीविकेच्या पारंपरिक कामांशी निगडीत कामे घेतली जावीत, म्हणजेच गावपातळीवर देखील रोहयो कामे उपलब्ध होतील व योजनेचे 'दुष्काळी' स्वरूप पालटेल.
- ज्यांच्याकडे जमिनी नाहीत अशा गटांना, विशेषतः निष्कृष्ट जमिनी असलेल्या दलितांना जमिनीच्या फेरवाटपातून फायदा मिळेल का याचा विचार व्हावा, त्याचप्रमाणे असे फेरवाटप करण्याऐवजी निष्कृष्ट जमिनींचा अधिक उत्पादक उपयोग करण्याच्या व्यवहार्य पर्यायावरही विचार व्हावा.
- आदिवासी डोंगराळ भागासाठी असलेल्या तरतुदींचा कामांच्या नियोजनासाठी प्रभावी उपयोग करून घेता यावा.
- शासनाच्या दृष्टीने 'शेतजमीन' हेच उत्पादनाचे एकमेव साधन मानले जाते, व त्यानुसार कार्यक्रम आखले जातात, परिणामी वंचित गटांकडून शेतजमिनीच्या मागणीला अवास्तव महत्त्व दिले जाते. 'जंगलजमीन' या उत्पादनाच्या शाश्वत साधनाकडे, त्यावरील हक्काकडे मात्र दुर्लक्ष होते. वंचित गटांच्या हक्काचे लढे 'जंगलजमिनीच्या' प्रश्नाभोवती होणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी 'जमीन' म्हणजे फक्त 'शेतजमीन' ही वंचितगटांची व त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या संस्था–संघटनांची मानसिकता बदलणेही गरजेचे आहे. 'शेतजमिनीचा लढा' हा हरणारा लढा आहे तर 'जंगलजमिनीचा लढा' हा जिंकणारा लढा आहे, जमीन हक्कांसाठी लढणाऱ्या चळवळींना (उदा. मराठवाड्यातील गायरान – दलित चळवळ) समजणेही आवश्यक आहे. 'जंगल जमिनीवरील हक्क व त्याचा उत्पादक उपयोग यातून जंगलावर अवलंबून असणाऱ्या 'स्त्रिया' या सर्वाधिक वंचित घटकांपर्यंत पोचता येईल हाही तितकाच महत्त्वाचा मुद्दा आहे.
- 'जमीन व पाणी' याबरोबरच जंगल व त्यावर आधारित एकात एक गुंफलेल्या प्रक्रिया उद्योगांच्या साखळीचा विचारही रोजगार हमीची कामे आखताना केला जावा. त्यासाठी कोणत्या प्रकारच्या नैसर्गिक–संसाधनांवर आधारित प्रक्रिया उद्योगातून – कोणकोणत्या प्रकारचा व किती रोजगार स्थानिक पातळीवर निर्माण होऊ शकतो याचा पद्धतशीर अभ्यास करणे महत्त्वाचे ठरावे.

- स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा महत्तम उत्पादक उपयोग कसा होऊ शकेल हे ठरवण्याचे अधिकार स्थानिक समूहांना असावेत. व्यवस्था बदलण्यासाठी असा प्रयत्न करण्याबरोबरच स्थानिक समूहांच्या हाती निर्णयप्रक्रिया गेल्याने प्रत्यक्षात काय साध्य होते हेही तपासत रहायला हवे.

चर्चासत्रातील इतर विवेचनांमधूनही वर मांडलेल्या 'अडचणी व उपाय–पर्यायांच्या' दिशेने मांडणी झाली. प्रा. एच.एम. देसरडा (औरंगाबाद) यांनी 'एकात्मिक पाणलोटक्षेत्र विकास' या रोजगार हमीमधेच अंतर्भूत असलेल्या कार्यक्रमाला लोकशक्तीची जोड कशी देता येईल याची मांडणी केली, तर मोहन हिराबाई हिरालाल यांनी रोजगार हमीतील श्रमशक्तीतून ग्रामविकास या मूलगामी कार्यक्रमाच्या माध्यमातून व 'अभ्यासाधारित' लोकसंघटनाच्या आधारे 'वंचिताभिमुख कारभार' व 'वंचितांची उपजीविका शाश्वती' या दोन्ही उद्दिष्टांपर्यंत कसे पोचता येईल याची मांडणी केली. अभ्यासाधारित लोकसंघटन याच माध्यमातून हीच उद्दिष्टे वेळ पडल्यास रोजगार हमीच्या विहित चौकटीपलीकडे जाऊनही कशी साध्य करता येतात याची अनुभवसिद्ध मांडणी आनंद कपूर यांनी केली. या सर्व विवेचनांचा व त्यावरील चर्चेचा संक्षिप्त आढावा यापुढे मांडलेला आहे.

## (क) प्रा. एच.एम.देसरडा (औरंगाबाद)

कोरडवाहू शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवून रोहयोंतर्गत कोणते कार्यक्रम कोणत्या दृष्टीने घेता येतील याचे विवेचन प्रा. देसरडा यांनी केले. त्यांच्या मांडणीतील प्रमुख मुद्दे याप्रमाणे :

- **कोरडवाहू शेतकऱ्याला प्राधान्य देण्याची गरज :** राज्यातील लागवडीखाली असणाऱ्या जमिनींपैकी ८५% जमीन कोरडवाहू आहे. त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास 'कोरडवाहू शेतकऱ्याच्या' विकासावर फार मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. कोरडवाहू शेतकऱ्याला शेतात पाणी, हाताला काम व दामाला अन्न मिळाल्याशिवाय कोरडवाहू शेतकरी शेतीत स्थिरावणार नाही व त्याला चरितार्थाची हमीही मिळणार नाही.
- **पाणलोटक्षेत्र विकासाची गरज :** कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रम जसा महत्त्वाचा आहे, तसाच 'संसाधनांची उत्पादकता' या मुद्द्याच्या दृष्टीनेही तो गरजेचा आहे. शासनाच्या जलसंधारण विभागाच्या माहितीनुसार महाराष्ट्रात दरवर्षी ७५ दशलक्ष टन मातीची धूप होते आणि त्यामुळे २५०० कोटीचे कृषी उत्पन्न, ५०० कोटींचे वनोपज व १६०० कोटी किंमतीचे पशुआधारित उत्पन्न, एवढ्या किंमतीचे नुकसान होते. याशिवाय महाराष्ट्रातील २० तालुक्यांमध्ये स्त्रियांना सरपणासाठी दर दिवस तीन तास तर पाण्यासाठी दर दिवस पाच दिवस घालवावे लागतात. नुकसान मोजताना या वेळ व श्रमांची सामाजिक–आर्थिक किंमत मोजणेही महत्त्वाचे आहे.
- **रोहयोत विधायक हस्तक्षेपाची गरज:** रोजगार हमी योजनेत आतापर्यंत ४०० कोटी मनुष्य दिवस काम झालेले आहे, त्यातील १०० कोटी मनुष्यदिवसांचे काम हे केवळ प्रतिमनुष्यदिन ५ रु. चे तर १०० कोटी मनुष्यदिवसांचे काम प्रतिमनुष्यदिन १० रु. चे आहे. या सर्व कामांमध्ये जमीन–वापराच्या नियोजनाचा अभावच प्रकर्षाने दिसून येतो. रोजगार हमी कायद्यानुसार 'मागेल त्याला काम' व 'सामूहिक संपत्तीची निर्मिती' बंधनकारक आहे. परंतु रोजगार हमीचा पैसा इतर कारणांसाठी वळवण्याचे प्रयत्न सातत्याने होत आहेत. म्हणूनच स्वयंसेवी संस्था व संघटनांनी लोकशक्ती संघटित करून त्यात विधायक हस्तक्षेप करण्याची गरज आहे.
- **रोहयोतून नैसर्गिक संसाधनांवर आधारित रोजगार निर्मितीची गरज :** रोहयो हा प्राकृतिक संसाधने आणि मानवी संसाधने यांतील दुवा होऊ शकतो. म्हणून समाजातील शेवटच्या माणसाला जगण्याची हमी मिळण्यासाठी रोहयोच्या माध्यमातून कामांची आखणी करता येऊ शकते. महाराष्ट्रात सर्वत्र किमान १०० मिलीपर्यंत पडणारा पाऊस, कमी–अधिक प्रमाणातील वनक्षेत्र यांचा त्यासाठी कौशल्याने उपयोग करता येऊ शकतो. जैविक बांध व त्यातून जैवमाल निर्मिती यांसारख्या पाणलोटाधारित कामांचा कालबद्ध कार्यक्रम तयार करता येऊ शकतो. महाराष्ट्रातील ६०,००० हे. लघुपाणलोटक्षेत्रासाठी 'नैसर्गिक संसाधनांचा मास्टर प्लान' तयार करून तो प्रत्यक्षात आणण्यासाठी रोहयो निधीचा उपयोग करता येऊ शकतो. त्यातूनच रोहयोतील कामांना कुशल कामांची जोड देता येऊ शकते. 'श्रमशक्तीतून ग्रामविकास' सारख्या कार्यक्रमातून 'माथा ते पायथा' असे एकात्मिक नियोजन करता येऊ शकते.

♦ **<u>प्रा. देसरडा यांचे प्रयत्न:</u>** रोजगार हमी सदस्य म्हणून काम करतानाही प्रा. देसरडा यांनी रोहयो निधीचा उपयोग एकात्मिक पाणलोटविकास कार्यक्रमासाठी व्हावा, या मागणीचा आग्रह धरलेला आहे, त्यासाठी जनहितविकास याचिकेचेही माध्यम वापरले आहे. रोहयो सुधारणा व पुनर्रचना समितीलाही त्यांनी एकात्मिक पाणलोटविषयक शिफारशी केलेल्या आहेत.

## (ड) मोहन हिराबाई हिरालाल (वृक्षमित्र, चंद्रपूर)

रोजगार हमीच्या सध्याच्या संरचनेचाच उपयोग वंचितांच्या उपजीविका हमीसाठी कसा करता येईल, याची संकल्पना प्रा. देसरडा यांच्या मांडणीतून पुढे आली. याच मुद्द्याचे विवेचन मोहन हिराबाई हिरालाल यांनी 'श्रमशक्तीतून ग्रामविकास' या रोहयो कार्यक्रमाच्या अनुषंगाने केले. 'रोहयोचा कारभार तसेच रोहयोचा आशय याबद्दलच्या सर्व अडचणींना श्रमशक्तीतून ग्रामविकास या कार्यक्रमामधून उत्तर मिळू शकते, असे या मांडणीतील प्रमुख सूत्र होते. रोजगार हमीतील अतिशय मूलभूत व क्रांतिकारी असा आशय या कार्यक्रमामध्ये सामावलेला आहे. स्त्रिया, अल्पभूधारक व भूमीहीन हे सर्व समाजातील शेवटचे घटक – त्यांना ताकद देण्याची क्षमता या कार्यक्रमामध्ये आहे. हेच त्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे, म्हणूनच संस्था व संघटनांनी श्रमशक्तीतून ग्रामविकास कार्यक्रमाचा मुद्दा पुढे आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे अतिशय गरजेचे आहे' या भूमिकेतून मोहन हिराबाई हिरालाल यांनी आपल्या प्रदीर्घ अनुभवाच्या आधारे मांडणी केली. त्यांच्या मांडणीतील प्रमुख मुद्दे याप्रमाणेः

♦ **<u>श्रमशक्तीतून ग्रामविकास कार्यक्रमाची गरज :</u>**

- रोजगार हमीच्या कायदेशीर चौकटीचा (म्हणजेच १ ते ११ नमुन्यांचा) आग्रह धरण्याची रणनीतीही एका मर्यादेपर्यंतच यशस्वी होते. 'गावपातळीवर करण्याजोगी कामे संपली' असे कारण देऊन संघटनातील हवा काढून घेतली जाते. रोजगाराची हमी ही 'जिल्हा पातळीवरील' हमी आहे. याचा उपयोग संघटन दडपण्याचे हत्यार म्हणून केला जातो. रोजगाराच्या हक्कांची मागणी करताना मजुरांनी थकून जावे व निरुपायाने रोजगार हमीचा आग्रह सोडून द्यावा असेच प्रयत्न व्यवस्थेकडून सातत्याने केले जातात. एकेकाळी महाराष्ट्रात रोजगार हमीच्या प्रश्नावरील संघटन ताकदवान होते. परंतु शासनाच्या 'कामे संपली ही सबब व जिल्ह्यात कोठेही काम देण्याचे हत्यार' यामुळे मजुरांची व संस्था–संघटनांची रोहयोसाठी संघटन करण्याची उमेद ओसरली, परिणामी रोहयोवरील चळवळ थंडावली. याच टप्प्यावर वि. स. पागे यांनी 'श्रमशक्तीतून ग्रामविकास' या रोजगारहमीच्या सुधारित कार्यक्रमांची आखणी केली.
- गावपातळीवर कोणती कामे काढावीत हा विचार 'शेल्फवरच्या' कामांतून होणे शक्य नाही. समाजातील शेवटच्या घटकांना उपजीविकेची हमी देण्यासाठी केवळ अकुशल कामांची हमी पुरेशी नाही. 'दारिद्र्य निर्मूलनासाठी तात्पुरता रोजगाराऐवजी सर्वांगीण ग्रामीण विकासाची गरज' आहे, असा सखोल विचार या कार्यक्रमाच्या आखणीमागे होता. या कार्यक्रमाची बलस्थाने, मर्यादा व त्यावरील उपायांचा 'आढावा' खाली मांडलेला आहे :

♦ **<u>श्रमशक्तीतून ग्रामविकास कार्यक्रमाची बलस्थाने :</u>**

- 'एकात्मिक पाणलोट विकासाचा' गावपातळीवरील नियोजनाचा आराखडा तयार करून त्याला मंजुरी देण्याचे अधिकार ग्रामसभेकडे.
- अकुशल कामांबरोबरच अंबर चरखा, ग्रामस्वच्छता अशा प्रकारच्या कामांतून कुशल कामे करण्याची संधी.
- गावपातळीवरील कामांमुळे निर्णयाचे अधिकार ग्रामसभेत असल्यामुळे स्त्रिया, तसेच बेरोजगार युवक व इतर अल्पभूधारक आणि भूमिहीन या शेवटच्या घटकांना निर्णय प्रक्रियेत सहभागाची संधी व उपजीविकेची हमी मिळेल. स्त्रियांच्या सहभागामुळे नियोजनाची गुणात्मकता वाढेल, 'श्रमशक्ती'तील सहभागामुळे तर बेरोजगार युवकांच्या क्रियाशक्तीला विधायक वाव मिळेल.

- श्रमशक्ती हा रोजगारहमीचाच सुधारित कार्यक्रम असल्यामुळे तो कोणत्याही विशिष्ट गटासाठी नसून संपूर्ण गावसमाजासाठी आहे. त्यामुळे त्यासाठी वर्गीय लढे उभे न राहता गावसमाजाचे एकसंध संघटन उभे राहू शकेल आणि 'फोडा आणि झोडा' या व्यवस्थेने (ब्रिटिशांप्रमाणे) अनुसरलेल्या कुटनीतीला चोख उत्तर देता येईल.

♦ **<u>श्रमशक्तीतून ग्रामविकास कार्यक्रमाच्या मर्यादा :</u>**

- नियोजनाचा अधिकार गावसमाजाकडे असला तरी निधी मात्र गावसमितीच्या हाती नाही, 'गावसमितीला' निधी हाताळता येणार/येत नाही, हे कारण त्यासाठी वापरले जाते, म्हणूनच गावसमितीकडे निधी जावा अशी मागणी करण्याची गरज आहे. 'वन रोजगार हमी' साठी रोजगार हमीचा निधी गावाच्या वनसंरक्षणसमितीला मिळावा असा आग्रह धरणेदेखील महत्त्वाचे आहे.

♦ **<u>शासनाची व्यूहनीती:</u>**

- 'कळीचा मुद्दा कोणता' याची उत्तम जाण व्यवस्थेला असते. गावसमाजाच्या हाती नियोजनाचा अधिकार देणारा 'श्रमशक्तीतून' ग्रामविकास कार्यक्रम हा असाच कळीचा मुद्दा आहे, हे हेरून तो सुरू होण्याआधीच बंद पाडण्यासाठी शासकीय यंत्रणेने सर्वतोपरी प्रयत्न केले, हे लक्षात घेऊन श्रमशक्तीचा मुद्दा पुढे आणण्याची गरज आहे.
- गावाचा विकास कसा करायचा याची दृष्टी व ज्ञान असलेले गावसमाज कोणताही गाजावाजा न करता कार्यरत असतातच. ते बघण्या–शोधण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. श्रमशक्तीतून ग्रामविकाससारख्या कार्यक्रमाची ताकद पुरेपूर वापरली जावी यासाठी प्रत्येक संघटना संस्थेने आपल्या कार्यक्षेत्रातील एकसंध गावसमाज असलेले व सर्वसहमतीने निर्णय घेणारे किमान एक गाव शोधावे. अशा गावसमाजातील ग्रामसभेची ताकद वाढवण्यासाठी त्यांना अभ्यासमंडळाची जोड द्यावी. 'ज्यांना कोणत्याही प्रश्नांचा अभ्यास करण्यात रस आहे, अशांचे हे अभ्यासमंडळ असेल, अशा अभ्यासमंडळात स्त्रियांना सहभागी केल्यास त्याची गुणवत्ता वाढते, त्याचप्रमाणे गावातील निरुद्योगी व त्यामुळे कुटाळक्या करणाऱ्या व्यक्तीच्या बुद्धिमत्तेलाही त्यातून विधायक वळण मिळू शकते. 'अभ्यासमंडळातून त्या–त्या प्रश्नाचा सखोल अभ्यास व त्या आधारे ग्रामसभेत सर्वसहमतीने निर्णय' ही पद्धत श्रमशक्तीला अतिशय पोषक–पूरक आहे. म्हणूनच 'श्रमशक्ती'च्या मुद्‌द्यावर संस्था–संघटनांची एकत्रित कृती होणे अतिशय गरजेचे आहे.
- रोहयोवर अनेक ठिकाणी पथदर्शी काम आतापर्यंत झालेले आहे. या कामामधून, विविध गटांच्या प्रयोगातून शिकणे व कसे शिकायचे–कसे करायचे याची समान रीत आहे. या पद्धती आपापल्या ठिकाणी कशा वापरायच्या, रोहयोच्या विविध पैलूंवर (संघटन, तांत्रिक, प्रशिक्षण) अभ्यास व काम कसे करायचे यासाठी संस्था व संघटनांचे निरनिराळे कार्यगट करता येतील. अशा प्रयत्नांतून रोहयोची थंडावलेली चळवळ पुनरुज्जीवित होऊ शकेल.
- शासनाने धारण केलेल्या पुरोगामी मुखवत्यामुळे लोकसहभागाला मान्यता देणे त्यासाठी तरतूद करणे व्यवस्थेसाठी बंधनकारक झालेले आहे. त्यामुळेच 'श्रमशक्तीतून ग्रामविकास' कार्यक्रमासाठी आग्रह धरण्याची ही संधी आहे, हे ओळखून त्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

यानंतर 'श्रमशक्तीतून ग्रामविकास'च्या मांडणीवर जी चर्चा झाली त्यातूनही **<u>अभ्यास व कृतींचे काही मुद्दे</u>** पुढे आले :

- १९९९ डिसेंबरच्या शासननिर्णयानुसार 'श्रमशक्तीतून ग्रामविकास कार्यक्रम' रोहयोच्या भूमी व जलसंधारण अभियान कार्यक्रमात विलीन करण्यात आलेला आहे. 'विलीन' याचा अर्थ श्रमशक्तीची मागणी आता करता येणार नाही, असे स्पष्टीकरण रोजगार हमी विभागाच्या सचिवांकडून मिळालेले आहे. प्रत्यक्षात मात्र विलीनचा अर्थ 'बंद' असा होत नसल्याने 'श्रमशक्ती बंद' असा अन्वयार्थ लावणे चुकीचे आहे. गावपातळीवरील गरिबांना श्रमशक्तीची मागणी करण्याचा, त्यासाठी संघटित होण्याचा हक्क आहे. मंत्रालयाच्या पातळीवर संघर्षाने सुरुवात करण्याऐवजी गावपातळीवर श्रमशक्तीची मागणी व त्याचा आग्रह स्थानिक यंत्रणेकडे करणे अशी सुरुवात करता यावी.
- जिथे गावसमाज एकसंध नसेल तिथे (उदा. अनेक जातींचे गट, विविध हितसंबंधांचे गट) 'श्रमशक्तीतून ग्रामविकास कार्यक्रम' सर्वसमावेशक कसा होईल याचा विचार करणे महत्त्वाचे असेल.

- ज्यांच्याकडे उपजीविकेचे कोणतेच साधन (श्रमाव्यतिरिक्त) नाही त्यांना उपजीविकेची हमी कशी देता येईल हा कार्यकर्ते व अभ्यासकापुढील अनुत्तरित प्रश्न आहे, म्हणूनच श्रमशक्तीतून 'भूमिहीनांना उपजीविकेची' हमी कशी मिळेल याचा नेमकी मांडणी होणे गरजेचे आहे.
- शासकीय पातळीवरही 'श्रमशक्तीतून ग्रामविकास'चा कार्यक्रम काही काळ राबवला गेला. राजकीय हितसंबंधांबरोबरच शासकीय यंत्रणेची अनास्था व लोकांमधील माहिती आणि संघटनाचा अभाव, यामुळे हा कार्यक्रम बंद पाडणे व्यवस्थेसाठी सुकर झाले. पुन्हा एकदा श्रमशक्तीची मागणी करताना अशा कोणकोणत्या कारणामुळे कार्यक्रम मागे पडला याचा अभ्यास करणे संवेदनशील शासकीय अधिकाऱ्यांचा या कार्यक्रमाबद्दलचा अनुभव विचारात घेणे त्याचप्रमाणे बहुविध जाती-जमातींच्या गरजा व प्राधान्यांना 'श्रमशक्तीतून ग्रामविकास कार्यक्रमा'मधे कसे सामावून घ्यायचे याचाही विचार होणे गरजेचे आहे व त्यानुसार कार्यक्रमाची पूर्वतयारी अधिक पक्की करणे आवश्यक असेल.
- श्रमशक्ती हा संघटित एकसंध गावसमाज असेल तेथे करण्याचा दीर्घकालीन कार्यक्रम आहे. जिथे गावसमाज असा एकसंध संघटित नसेल तेथे रोजगार हमीतील श्रमशक्ती व्यतिरिक्तची बलस्थाने वापरणेही तितकेच गरजेचे आहे.

## (इ) आनंद कपूर (मंचर, शाश्वत)

वंचितांसाठी उपजीविकेची हमी व रोहयो कारभारावर वंचितांचे नियंत्रण, या दोन उद्दिष्टांसाठी रोहयोतील अंगभूत बलस्थानांचा उपयोग कसा करावा, याचे विवेचन या आधी दिलेल्या इतर सर्व मांडण्यांमधून झाले. आनंद कपूर यांच्या मांडणीतून मात्र याच दोन उद्दिष्टांचा पाठपुरावा रोजगार हमीच्या चौकटीपलीकडे जाऊन तरीही रोजगार हमी निधीच्या माध्यमातूनच कसा करता येतो, याचे विवेचन झाले. 'रोहयोतून काम होणे हा केवळ शासकीय अधिकाऱ्यांच्या सूचनेतून घडलेला योगायोग होता' असे सुरुवातीलाच स्पष्ट करून, हे कसे झाले, त्यातून काय साध्य झाले, याचे बारकावे आनंद कपूर यांनी त्यांच्या मांडणीतून उलगडले. या मांडणीचा संक्षिप्त आढावा पुढे दिलेला आहे.

- **<u>कामाची भौगोलिक-सामाजिक पार्श्वभूमी :</u>** आंबेगाव तालुक्यातील डिंभे धरणाच्या ३०,००० हेक्टर पाणलोटक्षेत्रातील ३८-४० गावे व १०० ते ११२ आदिवासी वाड्या या परिसरातील विस्थापित व धरणग्रस्तांसोबत जवळ-जवळ २० वर्षांपासून शाश्वतचे काम सुरू आहे. भौगोलिकदृष्ट्या पश्चिम-पूर्व १५० किमी. लांबीचा तर जेमतेम ८-१० किमी. रूंदीचा व 'पर्जन्यछायेच्या' क्षेत्रातील हा प्रदेश डोंगराळ व तीव्र उताराचा झालेला आहे. या तीव्र उताराच्या डोंगर जमिनीवर मोठमोठ्या शिळांचे २.५ फूट दगडी बांध घालून येथील स्थानिक प्रामुख्याने आदिवासी दलित कुटुंबे भातखाचरे तयार करतात. त्यासाठी हे बांध घालण्याचे काम प्रत्येक कुटुंबासाठी सामूहिकरीत्या श्रम करून केले जाते. हा पारंपरिक कार्यक्रम स्थानिकांमध्ये 'पडकई' या नावाने ओळखला जातो. सामूहिक श्रम केले तरीही अवजड दगड वाहून तीव्र डोंगरउतारावर दोन ते अडीच फुटाचे बांध तयार करणे अतिशय वेळखाऊ व जिकिरीचे असते. डोंगरउताराच्या जमिनीवरील फिरती शेती आणि स्थानिकांनी पिढ्यान्‌पिढ्या जतन केलेल्या घनदाट जंगलातून मिळणारे हिरडा-बेहेड्याचे उत्पन्न जेमतेम ६-७ महिने पुरेल इतके असते. त्यामुळे आदिवासी कुटुंबांना भातखाचर पूर्ण होण्याआतच जगण्यासाठी - मजुरीसाठी स्थलांतर करावे लागते. धरणासाठी झळ सोसणाऱ्या या कुटुंबांना धरणाचा फायदा मात्र काहीच होत नाही. त्यामुळे शासनाने त्यांच्यासाठी देखील गुंतवणूक केलीच पाहिजे अशी भूमिका शाश्वतने घेतली.
- **<u>स्थानिकांनी शाश्वतच्या साह्याने सुचवलेला पर्याय :</u>** 'काही पिढ्या टिकेल आणि सर्वांनाच लाभ मिळेल' असे उत्पन्नाचे साधन हवे, अशी मागणी सामूहिकतेची आणि समानतेची संस्कृती मानणाऱ्या आदिवासींनी केली. त्याच भागातील एका गावाचे उदाहरण त्यांच्यासमोर होते. 'न्युक्लिअस बजेट' या आदिवासींसाठी असणाऱ्या योजनेचा उपयोग करून व संस्थेच्या मदतीने तसेच गावकऱ्यांच्या श्रमदानातून 'भातखाचर' तयार करण्याचा कार्यक्रम या गावात झाला होता. त्यामुळे त्यांना ६-७ महिन्यांऐवजी १०-११ महिने पुरेल इतके अन्नधान्य मिळू लागले. याच धर्तीवर १३ धरणग्रस्त गावांतही असाच कार्यक्रम घेण्याची मागणी उभी राहिली.

- **<u>शासकीय यंत्रणेचा प्रतिसाद :</u>** सुरुवातीला ही मागणी एकात्मिक आदिवासी विकासच्या संचालक त्याचप्रमाणे विभागीय आयुक्तांकडे केली. ग्रामस्थांनी विशेषतः महिलांनी त्यात पुढाकार घेतला. सातत्याच्या पाठपुराव्यामुळे आदिवासी–विकास आयुक्तांनी निधीची उपलब्धता असल्याने हा कार्यक्रम रोहयोअंतर्गत घ्यावा असे सुचवले. त्यानुसार स्थानिक व राज्यपातळीवरील रोहयो अधिकाऱ्यांचा स्थानिक लोकांनी जवळजवळ दोन वर्षे पाठपुरावा केला. तेव्हाचे रोहयोमंत्री व स्थानिक मंत्र्यांचा पाठिंबा असूनही हा कार्यक्रम मान्य करण्यात तांत्रिक अडचणी आल्या. या सर्व भागात तीव्र उतारावर भातखाचरे तयार करण्यासाठी तरतूदच शासकीय अस्तित्त्वात नव्हती, कमी उतारासाठी केवळ 'मजगीची' योजना उपलब्ध होती. मजगीअंतर्गत प्रति हे. ४७,००० रु. चा निधी मंजूर होता, तर संस्थेच्या अभ्यासाप्रमाणे हा खर्च प्रति हेक्टर १ लाख २२ हजार रु. इतका होता. हा खर्च उपलब्ध निधीपेक्षा बराच जास्त असल्याने केवळ चार गावांना 'प्रायोगिक तत्त्वावर' मान्यता मिळाली. या चार गावांतही संस्थेने ३३% तर गावकऱ्यांनी प्रतिहेक्टर अडीच ते तीन हजार रु. चे श्रमदान असा वाटा उचलला. या सर्व कार्यक्रमासाठी शासनाच्या विविध विभागांमध्ये समन्वय घडण्याची जबाबदारी *एक स्वतंत्र शासननिर्णय* काढून शाश्वतकडे सोपवण्यात आली.

- **<u>चार गावांतील प्रयोगाचा अनुभव :</u>** समन्वयाची भूमिका शाश्वतकडे आल्याने विविध खात्यांच्या कामाला गती आली. संवेदनशील शासकीय अधिकाऱ्यांशी संस्थेने जाणीवपूर्वक संपर्क जोपासला. कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी स्थानिक व शासकीय अधिकाऱ्यांना एकत्र आणले. वेळ आणि मनुष्यबळाच्या मर्यादेमुळे शासकीय अधिकाऱ्यांनी संस्थेच्या सूचनेनुसार तीस स्थानिक आदिवासी तरूणांना प्रशिक्षण दिले. त्यातून खातेफोडीचे किचकट काम सुकर व शक्य झाले. प्रत्येक लाभधारकाच्या जागेवर त्यांचा फोटो काढण्याची विहित प्रक्रियाही सोपी झाली. याशिवाय मजुरांनीच हजेरीपत्रक भरणे, मोजमाप करणे, यामुळे प्रशासकीय यंत्रणेच्या भ्रष्टाचारावर अंकुश येणे आणि स्थानिक मजुरांवर एकमेकांचा तसेच इतर तीन गावांतील मजुरांचा दबाव निर्माण होणे असा दुहेरी फायदा झाला.

- **<u>प्रयोगाच्या यशानंतर:</u>**
  - चार गावांतील प्रायोगिक कार्यक्रमाचे यश स्थानिक प्रशासनाने तर मान्य केलेच, शिवाय रोहयोच्या विभागीय आयुक्तांनी एका गावाला प्रत्यक्ष भेट देऊन सभा घेतली. चार गावांप्रमाणे जिथे कार्यक्रम झाला नाही असे १२ गावांचे गावकरी या सभेला उपस्थित होते. या यशामुळे तसेच ' धरण ग्रस्तांसाठीही' शासनाने गुंतवणूक केली पाहिजे व भातखाचरांमुळे मातीची मोठ्या वेगाने येणारी धूप थांबून गाळ नियंत्रणाने धरणाचे आयुष्यही वाढेल, या बिनतोड युक्तिवादांमुळे मोठ्या प्रमाणावर कार्यक्रमाला रोहयोंतर्गत मंजुरी मिळाली. ३८ गावांमध्ये त्याची पूर्वतयारी सुरू झाली.
  - रोहयोत अशा प्रकारची योजना नसल्यामुळे, या मोठ्या स्तरावरील कार्यक्रमाची नियमावली तयार करण्याचे काम शाश्वतकडेच सोपवले गेले. आधीच्या अनुभवाधारे लोकांच्या हातीच निर्णयप्रक्रिया राहील व भ्रष्टाचाराला वावच मिळणार नाही असे नियम लोकांबरोबर बसून तयार केले गेले. जसे की,
  - हजेरी मजुरांकडे
  - मोजमाप सोपे आर भातखाचरासाठी २,००० तर तेवढ्याच नाचणी–वरई/व भाजीमळ्याच्या खाचरासाठी ५०० रु. असे दर सुचवले.
  - खातेफोड प्रक्रिया आधीपासून सुरू – (गावात कॅम्पस लावून व स्थानिक स्वयंसेवकांमार्फत) या खातेफोड प्रक्रियेमुळे गावात पारदर्शकता आली, उशिरा का होईना पण जमीन–मालकी नवरा व बायकोच्या संयुक्त नावे झाली. ही प्रक्रिया दीर्घकाळ चालू राहील व त्यामुळे आठ ते नऊ हजार कुटुंबांच्या (सध्याचे ५,९७६ खातेदार) नावावर जमिनी होतील. एकसंध समाजामुळे गावांमधील राजकारण मर्यादितच राहिले. मोठ्या शेतकऱ्यांना खातेफोड स्वीकारणे जड गेले, परंतु गरीब व श्रीमंत यातील दरी फार मोठी नसल्याने तसेच कार्यक्रमात कोणालाही वगळले नसल्यामुळे संघर्ष मर्यादित राहिला. शासकीय अधिकाऱ्यांनाही ह्या क्लिष्ट वाटणाऱ्या प्रक्रियेतून लोकांचे भले होणार हे जाणवले. 'आता मरताना कायतरी चांगलं केलं असं सांगता येईल' हे समाधान मिळाले. त्यामुळे सरकारी यंत्रणेचा अडथळाही पुष्कळ सौम्य झाला.

- झालेल्या कामाचे पेमेंट नवरा व बायको या दोघांच्या नावावर संयुक्तपणे व चेकने केले जावे. त्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी आठवडी बाजाराच्या दिवशी बँकेची शाखा उघडावी व प्रत्येक लाभार्थीच्या नावे खाते उघडले जावे.

या सर्व नियमांना मंजुरी मिळण्याची शक्यता आहे.

'या अभिनव उपक्रमाचे, त्याच्या यशापयशाचे बारकावे उलगडणारे लिखाण होणे गरजेचे आहे' अशी उत्स्फूर्त प्रक्रिया गटाकडून व्यक्त झाली. त्याचबरोबर इतरही काही मुद्‌द्यांवर **चर्चा** झाली. त्याचा सारांश याप्रमाणे :

- 'पडकई' हा कार्यक्रम 'श्रमदान' नव्हे तर परस्परांना सहकार्य करण्याची परंपरा स्थानिकांमध्ये चालत आलेली आहे. या समाजाशी समरस होऊन संस्थेने लोकांचे कौशल्य, श्रम आणि शासकीय निधी यांची सांगड घालण्याची दृष्टी दाखवली. त्यातून गावपातळीवर लोकांच्या आवाक्यातून कार्यक्रमाद्वारे काही पिढ्या टिकेल अशी उत्पादनाची साधने तयार होऊ लागली.
- स्थानिकांच्या हाती नियोजन–आखणी–अंमलबजावणी व नियमनप्रक्रिया हे तत्त्व वापरण्यासाठी 'श्रमशक्तीतून–ग्रामविकास' कार्यक्रमात पुरेपूर वाव आहे. अशाप्रकारच्या कामाची ताकद श्रमशक्तीतून......सारख्या कार्यक्रमामुळे अनेक पटींनी वाढू शकते.
- मोजमापाची पद्धत सोपी करणे, मजुरांकडे हजेरी सोपवणे, रोखऐवजी चेकने व्यवहार यांसारख्या तरतुदींसाठी व्यापक पातळीवर आग्रह धरल्यास रोहयोचा कारभार पारदर्शक व जाबदायी होण्यास मोठाच हातभार लागेल.
- अधिक डोंगर उतारावर 'जंगल लावणे' हितकर असले तरीही त्यामुळे जंगल कमी होण्याचा धोका नाही. कारण, भातखाचरांमुळे एकूण १,२५,००० हेक्टर लागवडी योग्य जमिनीपैकी केवळ ४००० हेक्टर जमीन लागवडीखाली येईल. स्थानिकांसाठीही जंगलातून मिळणारे उत्पन्न महत्त्वाचे असल्याने 'शेतजमिनीचा' अतिरेकी आग्रह न धरण्याचे शहाणपण त्यांना परंपरेने दिलेले आहे.
- ३०,००० हेक्टरपैकी ३४% जमीन जंगल–जमीन आहे, शिवाय प्रत्येक गावात किमान एक–दोन–तीन देवराया ७००–८०० वर्षांपासून लोकांनीच जतन केल्या आहेत. त्याची दखल न घेता त्या भागात सरकारी राखीव अभयारण्य जाहीर केले आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिकांच्या हाती स्थानिक नैसर्गिक संसाधने व निर्णयाचा अधिकार देणारा 'पडकई कार्यक्रम' निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण ठरतो.
- तरीही या कार्यक्रमातून 'भूमिहिनांना' उपजीविकेची हमी मिळू शकत नाही, ही मर्यादा असून, त्यावर उपाय–पर्याय शोधणे गरजेचे आहे.

### (ई) सुभाष लोमटे (शेतमजूर कामगार रोजगार हमी समन्वय समिती)

दीड दिवसाच्या या विचारविनिमयानंतर 'काय करता येईल' या प्रश्नाचा विचार करताना सुभाष लोमटे यांनी व्यूहनीतीच्या अंगाने संक्षिप्त मांडणी केली. समन्वय समितीच्या कामाचा, तसेच एकेकाळी ताकदवान असणाऱ्या रोहयोवरील चळवळीचा त्यांनी धावता आढावा घेतला आणि रोहयोवर काम करणाऱ्या सर्व प्रकारच्या गटांनी समन्वय करण्याची त्यातून, संघटित ताकद उभी करण्याची गरजही आग्रहाने मांडली. मजुरांच्या संस्था–संघटना व चळवळींच्या व्यापक संघटनाला अभ्यास व वंचिताभिमुख विश्लेषणाचा आधार असावा असेही त्यांनी सुचवले. त्यासाठी व्यापक पातळीवर अभ्यास गट, कार्यगट आणि विभागवार बैठका होण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली.

या मांडणीच्या पार्श्वभूमीवर चर्चासत्राचे फलित म्हणून काय निष्पन्न झाले याची मांडणी केली आहे.

## चर्चासत्राचे फलित

दीड दिवसांतील चर्चा आणि देवाण–घेवाणीतून गाव–तालुका, जिल्हा–राज्य आणि राष्ट्र अशा विविध स्तरांवर काय–काय करायला हवे याचे अनेक मुद्दे पुढे आले. यातील काही मुद्दे दीर्घकालीन (Long-term) होते, तर काही

नजीकच्या भविष्यकाळाशी संबंधित (Short-term) होते. या विविध मुद्द्यांवर ‘कार्यगट’ तयार व्हावेत अशी सूचनाही पुढे आली होती. समारोपाच्या शेवटच्या सत्रात मात्र ‘कार्यगटांऐवजी’ ‘अभ्यासगटांची’ कल्पना मांडली व स्वीकारली गेली. अभ्यासगटांसाठीही अनेक विषय उत्स्फूर्तपणे सुचवले गेले. रोहयोवर किती विविधांगी काम होऊ शकते याचीच ती झलक होती. या मुद्द्यांचे विषयानुसार एकत्रीकरण करून ८ विषय अभ्यासगटासाठी निश्चित करण्यात आले. या प्रत्येक अभ्यासगटातील सदस्य व त्या–त्या अभ्यासटाचे समन्वयक खालीलप्रमाणे असतील असे ठरले :

| विषय | सदस्य | समन्वयक |
|---|---|---|
| **१. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कार्यक्रमाला महाराष्ट्रातील रोहयोच्या अनुभवाची जोड** | १. एच.एम.देसरडा<br>२. अश्विनी कुलकर्णी<br>३. संजय सावळे<br>४. मोहन हिराबाई हिरालाल<br>५. देवाजी तोपा<br>६. शुभदा देशमुख<br>७. केशव गुरनुले | **सीमा काकडे, प्रयास** |
| **२. पाणलोट–क्षेत्र आधारित**<br>**(या विषयात गाव–विकास नियोजन प्रक्रिया रोहयोची पूरक योजनांशी सांगड, गाव–पातळीवर रोजगाराचे सूक्ष्म नियोजन, पाणलोटक्षेत्र–नियोजन, नियोजनाची तांत्रिक बाजू व प्रशिक्षण, अशा अनेक विषयांचा एकत्रित अभ्यास करता यावा, अशी कल्पना आहे.)** | १. आनंद कपूर<br>२. एच.एम.देसरडा<br>३. मोहन हि.हि.<br>४. राम कौलगी<br>५. प्रांजळ दीक्षित<br>६. मेघना कुलकर्णी<br>७. अश्विनी कुलकर्णी<br>८. सीताराम तुवर<br>९. मुकुंद दीक्षित<br>१०. देवाजी तोपा | **संध्या एदलाबादकर, महिला जागृती समाज** |

| | | |
|---|---|---|
| **३. किमान वेतन** | १. नागेश हटकर<br>२. मोहन हि.हि.<br>३. सुभाष लोमटे<br>४. सीमा काकडे | **अश्विनी कुलकर्णी, वचन** |
| **४. करदात्यांचा अभ्यासगट** | १. शांताराम पंदेरे<br>२. शुभदा देशमुख<br>३. सीमा काकडे | **नरेंद्र बैस, वनसंपदा** |
| **५. रोहयो अंमलबजावणी गट**<br>**(नव्यानेच रोहयोचे काम सुरू करणाऱ्या तसेच करू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांना येणारे प्रश्न, त्याचप्रमाणे दक्षता पथके व विविध स्तरीय समित्यांच्या माध्यमातून होणारे नियमन यासारख्या विषयांचा अभ्यासही या गटात व्हावा अशी कल्पना आहे.)** | १. अश्विनी कुलकर्णी<br>२. मेघना कुलकर्णी<br>३. प्राजक्ता धुळप<br>४. सीमा काकडे<br>५. केशव गुरनुले<br>६. वासंती दीक्षित<br>७. देवाजी तोपा | **शुभदा देशमुख, आम्ही आमच्या आरोग्यासाठी** |
| **६. वनरोजगार हमी** | १. वासंती दीक्षित<br>२. मुकुंद दीक्षित<br>३. शुभदा देशमुख<br>४. संध्या एदलाबादकर<br>५. देवाजी तोपा<br>६. दशरथ बावनकर<br>७. मोतीराम ठाकरे<br>८. केशव गुरनूले<br>९. नरेंद्र बैस | **मोहन हिराबाई हिरालाल, वृक्षमित्र** |
| **७. रोहयो – इतिहास व वर्तमान चळवळी ह्यांचा परिणाम** | १. प्राजक्ता धुळप<br>२. कल्पना दीक्षित<br>३. अश्विनी कुलकर्णी<br>४. मुकुंद दीक्षित | **संजय सावळे, अभ्यासक** |
| **८. रोजगार हमी संघटन** | १. मोहन हि.हि.<br>२. नागेश हटकर<br>३. विलास भोंगाडे<br>४. सुभाष लोमटे | **मुकुंद दीक्षित, कार्यकर्ता** |

या आठ विषयांखेरीज 'रोजगार हमी योजना – पुनर्रचना व सुधारणा समितीचा प्रस्तावित अहवाल' या विषयावर अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर संघटित काम करावे, असे ठरले. तर 'जनसंपर्क माध्यमांचा प्रभावी उपयोग' या विषयासाठी अभ्यासगट न ठरता *'रोजगार हमी वार्तापत्र'* काढण्याची कल्पना पुढे आली. ही जबाबदारी 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' या संस्थेचे कार्यकर्ते राहूल बैस यांनी स्वीकारली आहे.

## अभ्यासगटांचे काम कसे चालेल?

**या प्रश्नाचा विचार करताना याप्रमाणे भूमिका मांडली गेली :** 'अभ्यास करू इच्छिणाऱ्या सर्वांसाठी अभ्यासगट खुले असतील, त्या–त्या विषयाचा अभ्यास करण्यात रस असणे हाच मुख्य निकष असल्यामुळे अभ्यासगटांसाठी कोणताही निधी उपलब्ध करून देण्याची गरज नसेल. त्या–त्या विषयावर काय कृती करावी हा निर्णय त्या–त्या अभ्यासगटात अभ्यास व चर्चेच्या आधारे घेतला जाईल. या आठ अभ्यासगटांमध्ये देवाण–घेवाण व्हावी व चर्चासत्रात सुरू झालेल्या विचार–विनिमयाच्या प्रक्रियेला गती मिळावी, यासाठी सर्व अभ्यासगटांमधील समन्वयाची जबाबदारी प्रयासने स्वीकारली आहे.

ही सर्व चर्चा शेवटच्या सत्रात झाली व त्यानेच दीड दिवसांच्या विचारविनिमयाचा समारोप झाला. प्रत्येक अभ्यासगटाने स्वतंत्रपणे आपली काम करण्याची पद्धत ठरवणे, त्यानुसार अभ्यासाची दिशा व तपशील ठरवणे, हा या चर्चासत्राचा पुढचा टप्पा असेल.

********

## उपस्थित कार्यकर्त्यांची नावे व पत्ते

१) शुभदा देशमुख, आम्ही आमच्या आरोग्यासाठी, मु. पो. कुरखेडा, जि. गडचिरोली–४४१२०९.
फोन नं. ०७१३९–२४५४७१/०७१२–२२६७५२०

२) आनंद कपूर, धोबी मळा, टेलिफोन एक्सचेंज जवळ, एटी/पीओ मंचर, जि. पुणे–४१०५०३.
फोन नं. ०२१३३–२२४१०७

३) प्राजक्ता धुळप, पुनर्वसन संघर्ष समिती, हरकलालनगर, प्लॉट नं.१९, राजरत्न बिल्डींग, ता. तळोदा, जि. नंदूरबार–४२५४१३.

४) मुकुंद दीक्षित, ४४१८, मालवीय चौक, पंचवटी, नाशिक–४२२००३.
फोन नं. ०२५३– २५११८६७ / ९८२३१०५४८५

५) अश्विनी कुलकर्णी, वचन, वसुंधरा बंगला, शिवाजीनगर, विजय–ममता थिएटरविरुद्ध, नाशिक–४२२००६.
फोन नं. ०२५३–४१२५२०

६) नागेश हटकर, जनसहयोग ट्रस्ट, श्रमसाधना, ५७, डी.व्ही. प्रधान रोड, हिंदू कॉलनी, दादर (पूर्व), मुंबई–४०००१४.
फोन नं. (०२२) २४१००२९८

७) एच.एम.देसरडा, सिडको एन–२ए, विठ्ठल नगर, औरंगाबाद–४३१००३, फोन नं. ०२४०–४८७९२४.

८) संजय सावळे, १३ देवगिरी अपार्टमेंट, एकता नगर, गंगापूर रोड, पम्पींग स्टेशनजवळ, नाशिक–४२२०१३.
फोन नं. ०७१७२–२५८१३४

९) देवाजी तोपा, वृक्षमित्र, एनईएसआर चिद्दरवार हॉस्पिटल, आरटीओ ऑफिसजवळ, रामनगर, चंद्रपूर–४४२४०१.
फोन नं. ०७१७२–२५८१३४

१०) संध्या एदलाबादकर, जागृत महिला समाज, तिरुपती बालाजी वॉर्ड, बल्लारपूर, चंद्रपूर–४४२६९८.
फोन नं.०७१७२–२४०८१५

११) नरेंद्र बैस, वनसंपदा, मु.पो. अंजनगावबारी, ता. जि. अमरावती, फोन नं.– ०७२१–२३८५२०४

१२) केशव गुरनुले,सृष्टी, मु. येरंडी, पो. गोठनगाव, ता. कुरखेडा, जि. गडचिरोली – ४४१२०९

१३) मोतीराम ठाकरे, जनार्थ आदिवासी विकास संस्था, रमानगरी, प्लॉट नं. ८, विजयनगर, ता. शहादा, जि. नंदूरबार.
फोन नं. ०२५६५–२२३१६५/२२५४९५

१४) शांताराम पंदेरे, लोकपर्याय, ४ बी, प्रणव प्लाझा, बी सेक्टर, औरंगपूरा, औरंगाबाद–४३१००१.
फोन नं. ०२४०–२३३२८६८/९४२२७०१८५७

१५) किशोर जगताप, चेतना विकास केंद्र, गोपूरी, ता. वर्धा, जि. चंद्रपूर, फोन नं. ०७१५२–४१४९७१.

१६) बंडू साने, खोज, शिवकृपा, गोविंद लॉजजवळ, गुलजारी बाजार, परतवाडा, जि. अमरावती–४४४८०५.
फोन नं. ०७२२३–२०४२५/९८९०३५९१५४

१७) विलास भोंगाडे, गोसीखुर्द प्रकल्प संघर्ष समिती, वनराई नगर, मानेवाडा, नागपूर–२४. फोन नं. ०७१२–२७०२१५९

१८) सुभाष लोमटे, १२५ समर्थ नगर, औरंगाबाद–४३१००१, फोन नं. ०२४०–२३३७८५५/९३२५२१२९३६

१९) सीताराम तुंवर, लोकपंचायत, लेन नं. ३, शिवाजीनगर, मु.पो.ता. संगमनेर, जि. अहमदनगर–४२२६०५.
फोन नं. ०२४२५–२२७१३४/९४२२२५६३२५

२०) मनिषा तोकले, मानवी हक्क अभियान, 'सम्राट', अशोकनगर, ता. माजलगाव, जि. बीड, फोन नं. ०२४४३–२४१५२१

२१) मेघना कुलकर्णी, सहयोग निर्मिती, मु. म्हाळुंब्रा, पो. तुंगी, ता. औसा, जि. लातूर–४३४१४०,
फोन नं. ०२३८३–२२१३३४/९८२२६१८२९२

२२) गजानन काळे, अपेक्षा होमिओ सोसायटी, गुरुकुंज मोझरी, ता. तिवसा, जि. अमरावती ४४४९०२.
फोन नं. (७२२५) २२४२४०, २२४१००